# बल्ली वरची शाळा

# "सुख समृध्दीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा..."




## उपक्रमकर्ता

**श्री अविनाश काशिनाथ पाटील**

## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे द्वारा आयोजीत

### राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा
### २०२३-२४

## उपक्रम गट क्रमांक ३

माध्यमिक व उच्च माध्यमिक गट

# बल्ली वरची शाळा...
# "सुख समृध्दीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा....."


## सादरकर्ता

श्री अविनाश काशिनाथ पाटील

एम. ए. बी एड.

सहाय्यक शिक्षक

बापूसाहेब डी. डी. विसपूते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वलवाडी ता. जि. धुळे

## मार्गदर्शक

मा. प्रा. जे. एस. पाटील

वरीष्ठ अधिव्याख्याता

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

# स्पर्धकाची माहिती

**नवोपक्रमाचे शिर्षक :** बल्ली वरची शाळा

"सुख समृध्दीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा..."

**नवोपक्रमाचा कालावधी :** जून २०२३ पासून

स्पर्धकाचे नाव :

(मराठीत) - श्री अविनाश काशिनाथ पाटील

(इंग्रजीत) - Mr. Avinash Kashinath Patil

**पद :** उपशिक्षक

**शैक्षणिक अर्हता :** एम.ए.

**व्यावसायिक अहर्ता :** बी.एड.

**जन्म तारीख :** १ ऑक्टोबर १९८०

**ई मेल :** akpatil979@gmail.com

**संपर्क :** ९८६०९८९४२६

**शाळेचे नाव :** आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे

बापूसाहेब डी. डी. विसपूते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वलवाडी ता. जि. धुळे ४२४००२

**शाळेचा युडायस :** २७०२०१०१४०७

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | 5 |
| २ | नवोपक्रमाचे शिर्षक | 6 |
| ३ | नवोपक्रमाची गरज व महत्व | 7 |
| ४ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 8 |
| ५ | नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही | 9 |
| ६ | नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पत्ती | 25 |
| ७ | समारोप | 29 |
| ८ | संदर्भसूची | 32 |
| ९ | परिशिष्ट | 33 |
| १० | सारांश | 36 |
| ११ | ऋणनिर्देश | |

# 1 - प्रस्तावना

**विद्येविना मती गेली ।**
**मतीविना नीती गेली ।**
**नितीविना गती गेली ।**
**गतीविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या वरील ओळी प्रसिद्ध आहेत. अज्ञान, दारिद्य, अंधश्रद्धा आणि समाजातील जातीभेद नष्ट करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही म्हणूनच त्यांनी इ.स. १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली व त्यानंतर ज्योतिबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली.

महात्मा फुलेंनी शिक्षणाची प्रेरणा अहमदनगरच्या मिस फरार यांच्याकडून घेतली होती तसेच स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावसबहीण सगुनाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली यातूनच प्रेरणा घेऊन सुरू झाली... 'बल्लीवरची शाळा' शिक्षक म्हणून काम करताना आपण समाजासाठी काहीतरी केले पाहिजे या भावनेतून ज्ञानदानाचे पवित्र कार्य हाती घेतले. अज्ञान, अंधश्रद्धा, अशिक्षित आणि निरक्षरतेचे काय दुष्परिणाम होतात हे जवळून अनुभवले आहेत. बल्ली वरील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करून त्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी प्रेरीत करण्याच्या हेतूने खऱ्या अर्थाने उपक्रमाला सुरुवात झाली कारण शिक्षणाने माणसात सर्जनशीलता येते, सर्जनशीलतेने तुमच्यात प्रगल्भ विचार येतात विचाराने ज्ञान वाढते आणि ज्ञानाने माणूस महान बनतो.

## 2 - नवोपक्रमाचे शिर्षक

## बल्ली वरची शाळा

## "सुख समृद्धीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा..."



## 3 - नवोपक्रमाची गरज व महत्त्व

"शिक्षण हा आपल्या जीवनाचा अनमोल दागिना आहे." अन्यथा संपूर्ण जीवन व्यर्थ आहे शिक्षण आपल्या सर्वांच्या उज्वल भविष्यासाठी अत्यावश्यक आहे. शिक्षणाचा उपयोग करून आपण आयुष्यात खूप काही मिळवू शकतो. शिक्षणाचा स्तर लोकांचा सामाजिक आणि कौटुंबिक आदर वाढवतो व स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करण्यास मदत करतो. शिक्षणाचा कालावधी प्रत्येकासाठी सामाजिक आणि व्यक्तिगत रूपाने महत्त्वपूर्ण असतो. शिक्षणाचे महत्त्व आपल्याला सगळ्यांना माहित आहेच म्हणूनच शासनाने देखील शिक्षण हक्क कायद्याची तरतूद करून मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद केली. शिक्षण क्षेत्रातील एक घटक म्हणून आपली जबाबदारी ओळखून व कर्तव्याची जाण ठेवून समाजातील शिक्षणापासून लांब असणाऱ्या वंचित घटकातील लोकांना मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले तर नक्कीच त्यांचे जीवनमान सुधारेल, विचार बदलतील, पिढी बदलेल व पर्यायाने राष्ट्र प्रगत होईल. करिअर आणि वैयक्तिक वाढ सुधारण्यास मदत करू शकते. सुशिक्षित व्यक्तीच समाजाचा उत्तम नागरिक बनू शकतो आणि हे जीवनात योग्य निर्णय घेण्यास मदत करते. या सगळ्या गोष्टींचा विचार अस्वस्थ करत होता जेव्हा या टेकडीवरील मुलांचे जीवन पाहिले. गावापासून दीड ते दोन किलोमीटर अंतरावरील मुले नियमीत शाळेत जाऊ शकत नव्हते म्हणूनच या ठिकाणी जाऊन शिकवायला सुरुवात केली. या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी टिकवून ठेवण्यासाठी या उपक्रमाची गरज वाटली.

"शिक्षणाकरीता नाही अट वयाची शिक्षणाने होईल आपली प्रगती खरी" बल्लीवर गेल्यानंतर त्या आदिवासी लोकांचे जीवन पाहून मन व्याकुळ व्हायचे. पोटाची खळगी भरण्यासाठी राब राब राबून देखील जीवनाच्या अत्यावश्यक गरजा भागवू न शकणारे आपल्या मुलाबाळांकडे त्यांच्या भविष्याकडे सुद्धा दुर्लक्ष करीत होते. शिक्षणापासून वंचित हे एक महत्त्वाचे कारण लक्षात आले म्हणून शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन यांच्या जीवनातील अंधार आपण दूर करू शकतो या विचाराने प्रेरणा मिळाली. हा समाज, ही वस्ती जर शिकली तर त्यांचे जीवन समृद्ध होईल हा आत्मविश्वास निर्माण झाला. शिक्षणातून त्यांचे व्यक्तिमत्व बहरू शकते, जीवनाचा मार्ग त्यांना सापडू शकतो. उज्वल भविष्याचे स्वप्न ते पाहू शकतात त्यांना गरज होती ती फक्त दिशा दर्शकाची, प्रेरणा देण्याची शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याची हेच नावीन्य मला या उपक्रमासाठी बळ देऊन गेलं.

# ४ - नवोपक्रमाची उद्दिष्टे

१] बल्ली वरच्या शाळेतील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती कमी करून उपस्थिती वाढविणे.

२] विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडवून सामाजिक दृष्टिकोन व्यापक करणे.

३] विद्यार्थ्यांसोबत पालकांमध्येही सांस्कृतिक मूल्ये रूजविणे.

४] विद्यार्थ्यांचा भविष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यापक बनवणे.

५] कृतियुक्त, आनंददायी अध्यापनातून विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन, संभाषण कौशल्य विकसित करणे.

## ५ - नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही

६ ते १४ वयोगटातील बालकांचा प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश असलेला आणि त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासाठी केंद्र शासनाद्वारे पारित केलेला एक शैक्षणिक कायदा हा बाल शिक्षण हक्काचा (आर.टी.ई) ४ ऑगस्ट २००९ रोजी अधिनियमीत केला गेला आणि भारतीय संविधानाच्या कलम २१ अ अंतर्गत १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला. हा कायदा १३५ देशांमध्ये लागू असून यात भारताचा समावेश आहे. याचा मुख्य उद्देश म्हणजे कोणीही शिक्षणापासून वंचित राहता कामा नये यासाठी शासनस्तरावरून अनेक योजना राबविल्या जातात. त्याचा काहीअंशी परिणाम झालेला आपल्याला दिसून येतो. परंतू या योजनांना यशस्वी करण्यासाठी प्रत्येक कर्तव्यदक्ष घटकाने प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे वाटते कोणतीही गोष्ट किंवा योजना राबवितांना त्यामध्ये अडचणी येतात परंतू सकारात्मकतेने त्यावर मात केली तर यश मिळते. या सर्व बाबींचा विचार करून या उपक्रमाला दिशा मिळाली.

'ज्ञानज्योती लावू घरोघरी दूर करू निरक्षरता सारी' या उक्तीनुसार ह्या नवोपक्रमातील प्रत्येक कृती ही विद्यार्थ्याला शिक्षणाची आवड निर्माण करणारी हवी याची मी काळजी घेतली. उपक्रम नियोजनबद्ध व यशस्वी होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष देता यावे यासाठी सर्वप्रथम टेकडीवर (बल्लीवर) सर्वे केला. प्रत्येक घरातील मुलांची माहिती एकत्रित केली त्यानंतर दररोज सकाळी दोन तास सुरू झाली 'बल्ली वरनी शाळा'.

### I] उपक्रम स्थितीचे निरीक्षण :

नकाने गावापासून साधारण दीड ते दोन किलोमीटर अंतरावर आदिवासी वस्ती आहे. या ठिकाणी साधारण ३०-३५ बेघर आहेत. माझ्या वर्गातील अनुपस्थित राहणाऱ्या विशाल नावाच्या मुलाची अनुपस्थितीची कारणे शोधताना लक्षात आले की या ठिकाणी २८ मुले शाळेत दाखल आहेत परंतु अधून मधून शाळेत जाणारे. ३ मुले दहावीत नापास झालेली आणि सहा ते सात मुलं सहा वर्षापेक्षा लहान अशी एकूण ३५ ते ३६ मुलं मुली टेकडीवर राहतात. पालकांमध्ये शिक्षणाबद्दल अनास्था, निरक्षरता, अंतरावर शाळा, लहान भावंडांना सांभाळणे, पालकांसोबत कामाला जाणे अशी एक ना अनेक कारणे लक्षात आली त्यामुळे शिक्षणात पाहिजे तशी प्रगती नव्हती. म्हणून या मुलांसाठी आपण

दररोज शाळेव्यतिरिक्त वेळ देऊन अध्यापन करायचे त्यांचे व्यक्तिमत्व घडवायचे आवश्यक कौशल्य रुजवायची यासाठी हा उपक्रम हाती घेतला.

### II] संबंधित व्यक्तिंशी तज्ञांशी चर्चा :

चर्चेच्या माध्यमातून समस्येवर उपाय मिळतो. प्रश्न सुटतो अशा परिस्थितीवर मात करणे अवघड व खूप जटील वाटत होते. परंतु निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या पाड्यावरील शिक्षकांची प्रेरणा मिळाली तसेच शरद पवार फेलोशिपच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभरातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे आमचे सहकारी मित्र यांचे प्रोत्साहन मिळाले. आमच्या संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. यांच्याशी चर्चा करता आली व अनेक अडचणींवर मात करून हा उपक्रम राबविता आला.

### III] आवश्यक साधनांचा विचार :

बल्ली (टेकडी) वरील मुलांना शिकविण्यासाठी सुरूवातीला काही साधने आवश्यक होती. त्याची पूर्तता होण्याआधी 'मातीची पाटी आणि काडीची पेन्सिल' त्या ठिकाणी निसर्गाच्या सानिध्यात एका निंबाच्या झाडाखाली शाळा सुरू झाली. त्यानंतर पाटी, वह्या, पेन्सिल, रबर, शैक्षणिक तक्ते, पुस्तके अशी आवश्यक साधने घेतली व सोबत स्पीकर मोबाईलच्या सहाय्याने प्रार्थना व शैक्षणिक व्हिडिओ दाखवण्यासाठी ब्लूटूथ स्पीकर, त्यानंतर बोलक्या भिंती. उपक्रम सुरू झाल्यानंतर प्रत्यक्ष काम करताना विद्यार्थ्यांना बसण्याची अडचण येत होती त्यासाठी श्री दिनेश बोरसे यांनी आसनपट्टी दिली व आमची शाळा सुरू झाली. अशाप्रकारे गरजेपुरती साधने घेऊन किंवा आवश्यकता असलेल्या साधनांचा विचार करून निसर्गाच्या सानिध्यात सुरू झाली 'बल्ली वरची शाळा.'

### IV] करावयाच्या कृतींचा क्रम :

नवोपक्रमाला योग्य दिशा देण्यासाठी कृतींचा योग्य क्रम ठरविणे आवश्यक होते. शाळेतला उपक्रम राबवितांना अनेक गोष्टींची मदत होते. उपक्रम राबविणे सोपे जाते परंतू याठिकाणी थोडे अवघड होते. परंतू जिद्द, आत्मविश्वास व प्रेरणेने आणि मार्गदर्शकांच्या सहकार्याने शक्य होत आहे.

# नवोपक्रमातंर्गत सातत्याने चालणारे उपक्रम

| उपक्रमाचे नाव | विद्यार्थी कृति |
|---|---|
| **पालक भेट** | बल्लीवरील विद्यार्थ्यांचा सर्वे करून नेमके किती व कोणत्या वर्गाचे विद्यार्थी याठिकाणी राहतात ती माहीती आवश्यक होती. म्हणून प्रत्येक घरी जाऊन सर्वेक्षण केले. |
| उपक्रमाची क्षणचित्रे - https://drive.google.com/drive/folders/1MJp2aW010Or59tMZuJQ9otYujLT4K8bR | |
| विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम<br>या उपक्रमासाठी सुरूवातीला नियोजन करणे अवघड जात होते. परंतू उपक्रमाला सुरूवात करण्यासाठी सर्व्हे करणे महत्वाचे वाटले. त्यासाठी पालक व विद्यार्थी यांनी अनमोल सहकार्य केले. बल्ली वरील शाळेसाठी त्यांनी होकार दर्शवला. | |

| उपक्रमाचे नाव | विद्यार्थी कृति |
|---|---|
| **पालक सभा / मार्गदर्शन** | उपक्रमाला सुरुवात करताना उपक्रमा संदर्भात विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन करणे गरजेचे वाटले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे आवश्यक वाटले, म्हणून त्यांना एकत्र करून सर्व विषय त्यांच्या भाषेत पटवून दिले. |
| उपक्रमाची क्षणचित्रे – https://drive.google.com/drive/folders/1MOfYb9uwC0XmGe3QlymvmSQJ16faUn66 | |
| विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम<br>ठरवलेल्या उद्दीष्टांनूसार पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यामुळे पालक व विद्यार्थी यांनी सकारात्मक विचार करून मुलांच्या शिक्षणासाठी होकार दिला. | |

<table>
<tr><th>उपक्रमाचे नाव</th><th>विद्यार्थी कृति</th></tr>
<tr><td>कौशल्य विकास</td><td>विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केले वाचन, लेखन, संवाद साधण्यासाठी प्रेरित केले. विविध प्रसंगातून विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना बोलकं करण्याचा प्रयत्न केला.</td></tr>
<tr><td colspan="2">उपक्रमाची क्षणचित्रे –<br>https://drive.google.com/drive/folders/1MoOsdVjLesJ3CJsHeHYDFWIA4Wjs5rkm</td></tr>
<tr><td colspan="2">विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम<br>या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे विविध कौशल्य वृद्धिंगत व्हायला वेळ लागला नाही. पर्यायाने त्यांना वाचन, लेखन व संवाद साधताना आनंद होऊ लागला आणि याचा सकारात्मक परिणाम शाळेबद्दल आस्था निर्माण झाली आणि शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटले.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>उपक्रमाचे नाव</th><th>विद्यार्थी कृति</th></tr>
<tr><td>आनंददायी शिक्षण</td><td>कोणतीही गोष्ट किंवा काम आनंदाने केले तर त्याचा सकारात्मक परिणाम होत असतो म्हणून आनंददायी अध्यापन करून विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम होईल हे जाणून घेतले.</td></tr>
<tr><td colspan="2">उपक्रमाची क्षणचित्रे –<br>https://drive.google.com/drive/folders/1MqNYIN77LmcgNN9xelXXhulp3vaY4-jl</td></tr>
<tr><td colspan="2">विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम<br>आनंददायी शिक्षणामुळे मुलं हसत हसत शाळेत येऊ लागली  शिक्षणाबद्दल किंवा शिक्षणाची असलेले विद्यार्थी आता मात्र स्वखुशीने शाळेमध्ये येऊ लागले होते, आनंदाने शिकू लागले होते, शिकण्याची आवड निर्माण झाली होती आणि विद्यार्थी त्यांच्या शाळेत सुद्धा नियमितपणे जायला लागले होते.</td></tr>
</table>

| उपक्रमाचे नाव | विद्यार्थी कृति |
|---|---|
| **विविध सण / उत्सव** | भारतीय संस्कृतीचे मूल्य रुजवण्यासाठी आपल्या सणांची माहिती त्यांना दिली. प्रत्यक्ष सण साजरे केले रक्षाबंधन, दसरा, दिवाळी यांचे महत्त्व पटवून दिले. या दिवशी काय करतात ते सांगितले यावेळी पालक देखील उपस्थित होते. |
| उपक्रमाची क्षणचित्रे – https://drive.google.com/drive/folders/1Mb_4TQBjZ4oEYbhCZlTDgJXAN9MSvctY | |
| विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम<br>विविध सण उत्सव यांचे महत्त्व पटवून दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोन व्यापक बनला संस्कृतीचे मूल्य त्यांच्यावर रुजवता आले परिणामी संपूर्ण वस्तीवर त्याचा सकारात्मक परिणाम झाला. | |

| उपक्रमाचे नाव | विद्यार्थी कृति |
|---|---|
| **शिक्षक दिन** | या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना एक दिवस शिक्षक बनून शिकवण्याची संधी मिळाली. शिक्षक म्हणून काम करण्याचा अविस्मरणीय अनुभव त्यांना घेता आला. शिक्षकांबद्दल आदर निर्माण झाला. |
| उपक्रमाची क्षणचित्रे – https://drive.google.com/drive/folders/1Mas-N-saeNOrcBW7MJ6mGVvT3hrLYDLl | |
| विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम<br>या उपक्रमामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. शिक्षणाचे महत्व विषद करता आले. शिक्षक म्हणून काम करतांना शिक्षणाची आवड निर्माण झाली. | |

<table>
<tr><th>उपक्रमाचे नाव</th><th>विद्यार्थी कृति</th></tr>
<tr><td>कृतियुक्त शिक्षण</td><td>अध्ययन अध्यापन पद्धतीत बदल केला तर त्याचा चांगला परिणाम पाहायला मिळतो म्हणून या मुलांसाठी कृतीयुक्त शिक्षणावर पहिल्यापासून भर दिला त्याचा त्यांच्या अध्ययनावर चांगला परिणाम पाहायला मिळाला यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.</td></tr>
<tr><td colspan="2">उपक्रमाची क्षणचित्रे –<br>https://drive.google.com/drive/folders/1MsEPhbRtGA32zgA4tFkgdXCppQ_Ak68A</td></tr>
<tr><td colspan="2">विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम<br>कृतीयुक्त शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे अध्ययन चांगले झाले ठरविलेल्या उद्दिष्टानुसार शिकवलेले चांगल्या प्रकारे समजण्यासाठी कृतीयुक्त शिक्षण महत्त्वाचे होते. यामुळे त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली. भविष्याचा वेध घेण्याची इच्छा निर्माण झाली</td></tr>
</table>

<table>
<tr><th>उपक्रमाचे नाव</th><th>विद्यार्थी कृति</th></tr>
<tr><td>स्वच्छता दूत</td><td>विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे आरोग्याचे महत्त्व पटवून दिला आरोग्याची आजाराची कारणे स्पष्ट करून सांगते आधी शारीरिक स्वच्छता व नंतर परिसराची स्वच्छता करायला सांगितले यासाठी स्वच्छता दूत ही संकल्पना राबवली याचा फायदा त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी झाला.</td></tr>
<tr><td colspan="2">उपक्रमाची क्षणचित्रे –<br>https://drive.google.com/drive/folders/1NvCWJjgB7clvomb8fJDlT1UOo0wj-DpA</td></tr>
<tr><td colspan="2">विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम -<br>या संकल्पनेमुळे विद्यार्थ्यांना आरोग्याचे व स्वच्छतेचे महत्त्व पटले त्यांचा प्रतिसाद वाखाणण्या जोगा होता. याचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर परिणाम झालेला दिसला आंघोळ करून यायला लागले. स्वच्छता दूत म्हणून सांभाळलेले काम त्यांना अभिमानास्पद वाटायला लागले.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>उपक्रमाचे नाव</th><th>विद्यार्थी कृति</th></tr>
<tr><td>सराव चाचणी</td><td>आपण शिकलेला घटक विद्यार्थ्यांना समजला आहे की नाही हे तपासण्यासाठी सराव पेपर घेतले. मार्क्स कमी जास्त मिळालेत परंतु त्यांच्या मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. अतिशय आनंददायी वातावरणात पेपर घेतले त्यामध्ये चांगले मार्क्स मिळाले तर बक्षीस स्वरूपात काहीतरी मिळेल याची जिज्ञासा त्यांच्या मनात निर्माण केली.</td></tr>
<tr><td colspan="2">उपक्रमाची क्षणचित्रे –<br>https://drive.google.com/drive/folders/1MhDkJx2sV08-7y395mqFORCdWuurw5xA</td></tr>
<tr><td colspan="2">विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम<br>या सरावामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती निघाली. त्याचा परिणाम त्यांचा आत्मविश्वास वाढला. परीक्षेत चांगले मार्क्स मिळवण्यासाठी प्रयत्न करू लागले. अभ्यासाकडे कल वाढला, त्याचा चांगला परिणाम दिसून आला.</td></tr>
</table>

| उपक्रमाचे नाव | विद्यार्थी कृति |
|---|---|
| **पर्यावरण संवर्धन** | शालेय जीवनात किंवा बालवयातच मुलांवर चांगले संस्कार घडत असतात म्हणून सन व पर्यावरण यांचे महत्त्व पटवून दिले पर्यावरण संवर्धनासाठी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करणार किती महत्त्वाचा आहे हे पटवून दिले पर्यावरण संवर्धन करणे आपलेच कर्तव्य आहे याची जाणीव निर्माण करून दिली विद्यार्थ्यांचा प्रतिसाद विद्यार्थ्यांवर परिणाम या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन म्हणजे काय व आपले कर्तव्य काय असायला हवे ते समजले या उपक्रमामुळे मुलांना जाणीव करता आली पर्यावरणाचे संवर्धन करणे आपलेच कर्तव्य आहे या मतावर्ते आहे अशाप्रकारे या उपक्रमाचा एक चांगला परिणाम झाला व माझे ठरविलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उपयोगात आला. |

| |
|---|
| उपक्रमाची क्षणचित्रे – <br> https://drive.google.com/drive/folders/1Mb_4TQBjZ4oEYbhCZlTDgJXAN9MSvctY |
| विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / परिणाम <br> या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन म्हणजे काय व आपले कर्तव्य काय असायला हवे ते समजते. या उपक्रमामुळे मुलांना जाणीव करता आली की पर्यावरणाचे संवर्धन करणे आपलेच कर्तव्य आहे या मतावर ते आले. अशाप्रकारे या उपक्रमाचा एक चांगला परिणाम झाला. |

## V] उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :

- विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण झाली.
- दररोज शाळेत यायला लागले.
- विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने भाग घेऊ लागले.
- विविध कौशल्यांचा वाचन, लेखन, संभाषण यांचा विकास होऊ लागला.
- व्यक्तिमत्व विकासासोबत आत्मविश्वास प्रबळ झाला.
- अभ्यास करायला आवडू लागले. शिकण्याची जिद्द निर्माण झाली.
- प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम झाला,
- शिक्षणाचे महत्त्व पटले.

## VI] कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्या मनातील भीती घालवून शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी नियोजनबद्ध टप्पे तयार केले. ते खालील प्रमाणे...

| अ.क्र. | कार्यवाही उपक्रम कृती | कालावधी |
|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक सहकारी व चेअरमन यांच्याशी उपक्रमाबाबत चर्चा | जून 2023 |
| २ | पालक भेट सर्वेक्षण | 25 ते 30 जून 2023 |
| ३ | पालक सभा मार्गदर्शन | जुलै 2023 |
| ४ | उपक्रम पूर्वतयारी | जुलै 2023 |
| ५ | उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबवणे.. | ऑगस्ट 23 पासून आज पर्यंत |

## VII] उपक्रमासाठी इतरांची मदत :

या उपक्रमासाठी जेव्हा विचार डोक्यात आला. त्यावेळेस संस्थेचे चेअरमन व प्राचार्य यांच्याशी चर्चा केली त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या तसेच सहकारी स्टापने सुद्धा प्रोत्साहन दिले. शिक्षण तज्ञ व शिक्षणाबद्दल आवड असणारे शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा व प्रोत्साहन दिले. माजी विद्यार्थी, पालक यांची मोठी मदत मिळाली. तसेच नकाने गावातील, वस्तीवरील लोकांचे सहकार्य मिळाले. बोलक्या भिंतींसाठी श्री गोकुळ पाटील व त्यांचा चिरंजीव माजी विद्यार्थी मयूर पाटील यांनी दिवाळी सुट्टीत दोन दिवस वेळ दिला. श्री दिनेश बोरसे यांनी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसन पट्ट्या व रंगाचे साहित्य खरेदी करून दिले. अशा प्रकारे अनेक लोकांच्या सहकार्याने उपक्रमाला चालना मिळाली.

## VIII] उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :

**बल्ली वरची शाळा**

**"सुख समृध्दीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा..."**

या उपक्रमाचे पुरावे खालील प्रमाणे सादर केलेले आहेत.

उपक्रमाचे महत्त्वाचे क्षणचित्र खालील लिंक मध्ये अपलोड केलेले आहेत...

https://drive.google.com/drive/folders/1MsS2TCStzRMTITDj5fFc_oWNGmCQdgKa

https://drive.google.com/drive/folders/1MsS2TCStzRMTITDj5fFc_oWNGmCQdgKa

उपक्रमा संदर्भात यूट्यूब चॅनल वरील व्हिडिओची लिंक खाली दिलेली आहे...

https://youtu.be/8gL2Nd_EzH4?si=6utcU55UtKaYFnvq

https://fb.watch/mTAE7_-WY2/?mibextid=Nif5oz

https://youtube.com/playlist?list=PLWwTqKMEzRXrj6VboFTB7j___QZ51DTXW&si=-Lt2lTZVQj0u_Idi

विविध वृत्तपत्रांनी उपक्रमाची दखल घेतल्याचे वृत्त खालील लिंक मध्ये अपलोड केलेले आहेत.

**शिक्षक दिन विशेष • अविनाश पाटील यांनी विद्यार्थ्यांना लावली शिक्षणाची गोडी, कृतियुक्त शिक्षण**

# वर्ग, ना फळा टेकडीवर भरते 33 मुलांची शाळा

गणेश सूर्यवंशी | धुळे

विद्यार्थी नियमित शाळेत येत का नाही या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी शिक्षक अविनाश पाटील यांनी सुरू केलेला शोध टेकडीवरील शाळेपर्यंत येऊन ठेपला. या टेकडीवर कोणताही वर्ग-फळा नसताना झाडाखाली ३३ मुलांची आता नियमित शाळा भरते आहे. शाळाबाह्य असलेल्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी अविनाश पाटील दगडगोटे, जमिनीचा वापर करून कृतियुक्त शिक्षण देत आहे. त्यामुळे ही शाळा कौतुकाचा विषय ठरली आहे.

नकाणे गावापासून सुमारे दोन किमी अंतरावर असलेल्या एका टेकडीवरील वस्तीमधील मुले शाळेत अनियमित येत होती. त्यामुळे या मुलांचे प्रश्न समजून घेण्यासाठी शहरातील नकाणे रोडवरील डी. डी. विसपुते विद्यालयात शिक्षक असलेले अविनाश पाटील त्यांच्यापर्यंत पोहोचले. त्यांनी शाळेत न येणाऱ्या मुलांच्या पालकांशी संवाद साधला. त्या वेळी त्यांना या टेकडीवर काही शाळाबाह्य मुले असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे शाळेत न जाणाऱ्या या मुलांना शिक्षणाची गोडी कशी लावावी, असा प्रश्न त्यांना पडला. त्यातून त्यांनी टेकडीवर सकाळी ८ ते १० या वेळेत निसर्गाच्या सान्निध्यात शाळा सुरू केली. स्थानिक लक्ष्मीबाई नामक महिलेने त्यासाठी जागा स्वच्छ केली. निंबाच्या झाडाखाली अविनाश पाटील यांनी मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. या ठिकाणी फळा नसल्यामुळे अंकगणित, ए टू झेड, बाराखडी आदींचे शिक्षण अविनाश पाटील दगडगोटे व जमिनीचा वापर करून मुलांना देतात. कृतियुक्त पद्धतीने शिक्षण मिळत असल्याने ३३ विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण झाली. त्यामुळे आता अविनाश पाटील येण्यापूर्वीच मुले टेकडीवरील अनोख्या शाळेत येऊन बसतात.



वर्ग, ना फळा तरी डोंगर टेकडीवर भरते ३३ मुलांची शाळा.

## पाठिंब्यामुळे मिळाले बळ

पारोळा तालुक्यातील पिंपळे खुर्द येथील रहिवासी असलेले अविनाश पाटील २० वर्षांपासून शिक्षक म्हणून सेवारत आहे. सकाळी शाळाबाह्य मुलांना शिकवण्यापासून त्यांचा दिनक्रम सुरू होतो. त्यानंतर ते दुपारी शाळेत जातात. त्यासाठी त्यांना शाळेचे चेअरमन, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक अन् पत्नी प्रतीक्षा यांचा पाठिंबा मिळतो.

## शिक्षणामुळेच जीवनात बदल

नकाणे रोडवरील एका वसाहतीत लक्ष्मण अहिरे, ज्योती मोरे राहतात. ते विसपुते शाळेचे माजी विद्यार्थी आहे. शिक्षण घेतल्यामुळे लक्ष्मण सैन्यात तर ज्योती मुंबई पोलिस दलात भरती झाली. शिक्षणामुळे दोघांच्या जीवनात झालेला कायापालट याची माहिती शिक्षक अविनाश पाटील यांनी शाळेत नियमित न येणाऱ्या मुलांसह त्यांच्या पालकांना दिली. त्यामुळे पालक-मुलांचा शिक्षण घेण्याकडे कल वाढला.

# आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लावणारा शिक्षक अविनाश पाटील



धुळे (यशवर्धन देवरे,दै.धुळे दवंडी) : प्रत्येकाच्या जीवनात शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे सर्वांसाठी पुढे जाण्यासाठी आणि यश मिळवण्यासाठी योग्य शिक्षण ही एकमेव मौल्यवान संपत्ती आहे आपल्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासोबतच आपले व्यक्तिमत्व घडवण्यासही मदत होते शालेय शिक्षण प्रत्येकाच्या जीवनातील असा टप्पा आहे जो प्रत्येक व्यक्तीने उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आपल्या मुलांना आणि देशातील तरुणांना यशाच्या दिशेने जाताना पाहायचे आहे जे केवळ चांगल्या आणि योग्य शिक्षणाने शक्य आहे शिक्षणाचे वर्णन आपण एका शब्दात करू शकत नाही शिक्षण हे आपले जीवन आहे जे आपल्याला जगायला शिकवते शिक्षणाचा स्तर लोकांचा सामाजिक आणि कौटुंबिक आदर वाढवतो व स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यास मदत करतो. या सर्व गोष्टींचा विचार करून महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, साने गुरूजी व ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून समाजातील शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या घटकासाठी काही करता येईल का विचाराने अस्वस्थ झालो. माझ्या वर्गातील विद्यार्थी विशाल हा लांब एका टेकडीवर राहतो. त्याचा पाठपुरावा केला असता तो शाळेत येऊ शकत नव्हता. त्याच्यासह टेकडीवर एकून ३०/३२ विद्यार्थी होते. पालक कामानिमित्त शेतावर गेले की ते फक्त खेळण्याचे काम करतात. शाळेत नियमीत येत नाहीत. त्याचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. म्हणून यांना शाळेची गोडी निर्माण करण्यासाठी दररोज सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत क्लासच्या माध्यमातून शिकवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या पालकांची मिटींग घेऊन शिक्षणाची जबाबदारी व महत्व पटवून दिले. त्यांनीही मुलांना नियमीत पाठविण्याचे आश्वासन दिले. आज या बस्ती वरच्या शाळेत सकाळी मी जाण्याच्या आधी मुले येऊन बसतात. गेल्या १५/२० दिवसांमध्ये त्यांच्यात समाधानकारक प्रगती दिसलेली आहे.

सकाळ

# 'बोलक्या भिंतीं'तून विद्यार्थ्यांना शिक्षण

## विसपुते विद्यालयाचे शिक्षक, माजी विद्यार्थ्यांची संकल्पना

सकाळ वृत्तसेवा



धुळे : घराच्या भिंतींवर शैक्षणिक तक्ते रंगवून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न करताना उपक्रमशील शिक्षक अविनाश पाटील, गोकुळ पाटील, माजी विद्यार्थी मयूर पाटील.

धुळे, ता. २४ : दिवाळी सुट्यांमध्येही मुले शिक्षणापासून दूर जाऊ नयेत, त्यात खंड पडू नये, या सुट्यांचाही सदुपयोग व्हावा या उद्देशाने वल्वाडी येथील डी. डी. विसपुते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक व माजी विद्यार्थी यांनी बल्लीवरील घरांच्या भिंती बोलक्या केल्या अर्थात या भिंतींवर शैक्षणिक तक्ते रंगविले. यातून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण झाल्याचे शिक्षक म्हणतात.

'सुख समृद्धीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा' यानुसार प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षण खूप मोलाची भूमिका बजावत असते. शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणाने माणूस विचारी आणि विवेकी बनतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, स्वतःचा, समाजाचा, पर्यायाने देशाचा विकास होतो. त्यामुळे शासनाने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून बापूसाहेब डी. डी. विसपुते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपक्रमशील शिक्षक अविनाश पाटील यांनी बल्ल्यावरील मुलांसाठी तेथे जाऊनच शिक्षण द्यायला सुरवात केली आहे. गेल्या काही दिवसांपासून श्री. पाटील यांनी मुलांना शिकवायला सुरवात केली. त्यासाठी ते काही नवीन प्रयोगही करत आहेत. दिवाळीच्या सुटीत त्यांनी दिनेश बोरसे यांच्या सहकार्यातून व माजी विद्यार्थी मयूर पाटील व आदर्श शिक्षक गोकुळ पाटील यांच्या मदतीने बल्लीवरील भिंतींवर शैक्षणिक तक्ते रंगविले. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या नजरेसमोर अंकगणित, इंग्रजी मुळाक्षरे व मराठी चार्ट राहतील. विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांनाही शिक्षणाची आवड निर्माण होऊ लागल्याचे शिक्षक पाटील व सहकाऱ्यांचे निरीक्षण आहे. दरम्यान, दिवाळीनिमित्त विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी सोबत दिवाळी फराळाचा आस्वाद घेतला. पर्यावरणपूरक सण-उत्सव साजरे करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले. दिवाळी सुटीचा अभ्यासही विद्यार्थ्यांना दिला. समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी एक जबाबदार शैक्षणिक घटक म्हणून आपल्याला काही करता येईल या विचारातून 'बल्ल्यावरची शाळा' सुरु केल्याचे शिक्षक पाटील म्हणतात. आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र विसपुते, सचिव स्मिता विसपुते, प्राचार्य पी. बी. पाटील व सहकाऱ्यांचे या उपक्रमासाठी श्री. पाटील यांनी सहकार्य व प्रोत्साहन मिळाले.

Dhule, Dhule-Today
25/11/2023 Page No. 4

"बल्ल्या वरची शाळा..."

'सुख समृद्धीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा.'

आमच्या विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक, श्री अविनाश पाटील हे नेहमी नविन नविन उपक्रम राबवित असतात. पालकांच्या संपर्कात राहून त्यांच्या समस्या, अडचणी जाणून घेतात. गृहभेटी, पालकभेट त्यांच्या आवडीचा व जिव्हाळ्याचा विषय... यातूनच त्यांच्या या नवोपक्रमाला दिशा मिळाली आणि सुरु झाली "बल्ल्यावरची शाळा..."

शिक्षणाचे महत्व आपण सारे जाणून आहेत. शिक्षणापासून कोणीही वंचीत राहू नये या प्रामाणिक हेतूने श्री पाटील सरांनी हा उपक्रम सुरु केला. आणि आमच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ झाला. त्यांच्या सोबत इतर विद्यार्थ्यांनाही त्याचा फायदा होत आहे. त्यांच्या गुणवत्तेत व्यक्तीमत्वामध्ये त्याचबरोबर शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. या उपक्रमातून विद्यार्थी पालक व शिक्षक यांना प्रेरणा मिळत आहे.

"बल्ल्या वरची शाळा."

'सुख समृद्धीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा'

श्री अविनाश काशिनाथ पाटील (उपशिक्षक) बापूसाहेब डी. डी. विसपुते माध्य. व उच्च माध्य विद्यालय यांनी जो अभिनव उपक्रम सुरु केला आहे. त्यामुळे आमच्या शाळेतील बल्ली (टेकडी) वर राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बराच बदल झालेला आहे. 'बल्ली वरची शाळा' या उपक्रमामुळे तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वामध्ये, प्रगतीमध्ये तसेच उपस्थिती मध्ये सुद्धा सुधारणा झालेली आहे.

श्री अविनाश पाटील सरांनी सुरु केलेला "बल्ली वरची शाळा" हा नविन उपक्रम शिक्षकांसाठी सुद्धा प्रेरणादायी असून आदिवासी मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणारा आहे. सरांच्या या उपक्रमाला आमच्या कडून सदिच्छा!

मुख्याध्यापक
जि.प.आदर्श शाळा, नवाळे
ता.जि.धुळे.

**नवोपक्रमाची कार्यवाही**

या उपक्रमाला सुरुवात करताना चर्चेतून काही महत्त्वाचे मुद्दे समोर आले होते. त्या आधारे कार्यपद्धती निश्चित केली. विविध उपक्रमांच्या आधारे उपक्रमाला दिशा मिळत गेली. पालक भेट, तज्ञांशी चर्चा, विचारविनिमय, पालकांना मार्गदर्शन, सभांचे आयोजन, प्रत्यक्ष अध्यापन, आनंददायी व कृतीयुक्त अध्यापन इ.

**१] उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षणे व नोंदी :**

अनुपस्थित विद्यार्थ्यांच्या शोधार्थ बल्लीवर गेलो असता विद्यार्थी बघून पळ काढत होते. शाळेबद्दल शिक्षणाबद्दल त्यांना भीती वाटत होती. पालकांशी चर्चा केल्यानंतर कारणे लक्षात आली. गैरहजेरीचे अनेक कारणे समोर आले त्यामध्ये पोटाची खळगी भरण्यासाठी कामधंदा, अंतरावर शाळा हे कारण लक्षात आले. म्हणून तेथेच जाऊन अध्यापनाला सुरुवात केली. विद्यार्थी व पालक यांच्या मनातील भीती घालवून शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी प्रोत्साहन दिले. भविष्य उज्वल घडावे या हेतूने उपक्रमाला सुरुवात केली.

**२] कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन :**

- या उपक्रमाची कार्यवाही करतांना काही महत्त्वाचे निरीक्षणे लक्षात आली ती म्हणजे,
- बल्ली वरील लोकांमध्ये शिक्षणाबद्दल आस्था पाहिजे तेवढी प्रगल्भ नव्हती.
- विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड नव्हती.
- विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये व्यक्तिमत्व विकासाचा अभाव दिसत होता.
- विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन व संवाद साधने, संभाषण कौशल्यांचा पाहिजे थोडा विकास झालेला नव्हता.
- स्वच्छतेच्या बाबतीत जागरूकता नव्हती.
- अध्ययन अध्यापन प्रक्रियेत रस नव्हता.
- दिशाहीन जीवन जगत होते.
- सांस्कृतिक मूल्यांचा अभाव दिसला जीवनमान सामान्य होते.
- आरोग्याकडे दुर्लक्ष होते.

### ३] उपक्रम झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी :

उपक्रम सुरू झाल्यानंतर बराच बदल जाणवला. विद्यार्थी व पालक यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला. आपले आयुष्य बदलू शकते, आपल्या मुलाचे भविष्य घडू शकते याचा आत्मविश्वास निर्माण झाला होता. खालील महत्त्वाचे बदल लक्षवेधक ठरले...

महत्त्वाचे म्हणजे बल्ली वरील पालक व विद्यार्थी यांचे व्यक्तिमत्व घडायला सुरुवात झाले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण झाली.

### ४] कार्यवाही करतांना आलेल्या अडचणी :

हा उपक्रम राबविताना सुरुवातीला वेळ निश्चितीबाबत अडचण होती. कारण या मुलांना सकाळी लवकर उठण्याची सवय नव्हती. तसेच काही विद्यार्थी कामाला जाणार होते त्यांची पण समस्या उद्भवली. काही विद्यार्थी वयाने व शरीराने मोठे होते त्यांना वर्गात येऊन बसायला कमीपणाचे वाटायचे. पालकांना पटवून देताना दमछाक झाली. शिक्षणाचे महत्त्व अशिक्षित लोकांना समजावून सांगणे खूप अवघड काम वाटले. येण्या जाण्याचा रस्ता सुद्धा खडतर होता. एका अरुंद पायवाटेने बल्लीवर जावे लागे तसेच अध्यापन करताना या सर्व विद्यार्थ्यांना शिकवणे त्याचे नियोजन करणे अवघड होते. कारण या शाळेमध्ये इयत्ता पहिली ते दहावीचे विद्यार्थी होते. विविध उपक्रम राबविताना तसेच त्यांच्याशी संवाद साधताना भाषेची समस्या निर्माण झाली. त्यावेळेस त्यांच्या भाषेमध्ये संवाद साधावा लागला त्यांना आपलेसे करण्यासाठी त्यांच्यामध्ये मिसळणे गरजेचे होते ते सुद्धा अवघड वाटत होते.


शाळा व अभ्यास याबाबत मनातील भीती आनंददायी व कृतियुक्त शिक्षणामुळे निघाली. स्पर्धेच्या युगात आपणही ठामपणे उभे राहू शकतो हा आत्मविश्वास

निर्माण झाला. विविध कौशल्यांचा विकास झाला. सांस्कृतिक मूल्यांबरोबर इतर महत्त्वाची मूल्ये जोपासू लागले. हळूहळू जीवनमान उंचावू लागले होते.

### ५] माहितीचे विश्लेषण आलेख, तक्ते :


या उपक्रमांमध्ये एकूण विद्यार्थ्यांचे दोन गट केले. यामध्ये इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचे व पाचवी ते दहावीचे विद्यार्थी असे दोन गट केले. त्यांची पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी घेतली. त्याचे गुणदान खालील प्रमाणे ...

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी |
|---|---|---|---|
| 1. | अर्चना आबा मोरे | 4 | 7 |
| 2. | दीपक शामराव बागले | 3 | 5 |
| 3. | अर्चना अधिकार सोनवणे | 5 | 8 |
| 4. | कृष्णा हिलाल मोरे | 4 | 6 |
| 5. | बादल हिलाल मोरे | 4 | 6 |
| 6. | शुभम संजय सोनवणे | 6 | 8 |
| 7. | गणेश जगदीश अहिरे | 4 | 7 |
| 8. | रोहिणी बादल मोरे | 6 | 9 |
| 9. | शुभम मनोज सोनवणे | 6 | 8 |
| 10. | गीता एकनाथ सोनवणे | 3 | 6 |





| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी |
|---|---|---|---|
| 1. | शितल एकनाथ सोनवणे | 4 | 6 |
| 2. | शितल जगदीश अहिरे | 4 | 7 |
| 3. | भावना विजय पवार | 5 | 8 |
| 4. | विनाली अधिकार सोनवणे | 5 | 8 |
| 5. | दिनेश बापू बागुल | 5 | 8 |
| 6. | सविता शामराव सोनवणे | 6 | 8 |
| 7. | सोनाली हिलाल मोरे | 4 | 6 |
| 8. | लक्ष्मी बापू बागुल | 4 | 7 |
| 9. | रवींद्र विजय पवार | 6 | 9 |
| 10. | मोंटी आबा मोरे | 6 | 8 |
| 11. | अश्विनी जगदीश अहिरे | 5 | 8 |
| 12. | संजीवनी जिभाऊ गायकवाड | 7 | 9 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13. | गायत्री विजय पवार | 5 | 7 |
| 14. | गायत्री हिलाल मोरे | 4 | 6 |
| 15. | विशाल सुरेश सोनवणे | 5 | 8 |
| 16. | मीनाक्षी लाल मोरे | 4 | 6 |
| 17. | रोहित संजय सोनवणे | 6 | 8 |
| 18. | तेजस जिभाऊ गायकवाड | 7 | 10 |
| 19. | निलेश जिभाऊ गायकवाड | 5 | 8 |
| 20. | दिपाली संतोष सोनवणे | 6 | 8 |
| 21. | प्रवीण युवराज मोरे | 5 | 6 |




## ६ - नवोपक्रमाची यशस्वीता / फलनिष्पत्ती

विद्यार्थ्यांना उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्न केला. त्याचे फलित गुगल फॉर्मच्या माध्यमातून काही महिन्यांनी आजमावले. वीस विद्यार्थ्यांनी गुगल फॉर्म भरून प्रतिसाद दिला. हा प्रतिसाद वृत्तलेखाद्वारे दर्शवला आहे. या वृत्तालेखात हिरव्या रंगाच्या छटा सकारात्मक निकाल दर्शवतात तर लाल रंग नकारात्मक निकाल दर्शवतात.




२] बल्ली वरनी शाळा ही संकल्पना तुम्हाला आवडली आहे का ? Copy

20 responses





३] तुम्हाला शाळेत दररोज जायला आवडेल का ? Copy

20 responses




४] शिक्षण घेऊन भविष्यात चांगला नागरिक व्हायचे आहे का ? Copy


20 responses




५] बल्ली वरच्या शाळेमुळे तुमच्या शिक्षणात बदल झालेला आहे का ? Copy

20 responses






या आलेखाच्या विश्लेषणातून असे दिसून येते की, खरोखरच उपक्रमाच्या सुरुवातीला शिक्षणाबद्दल अनास्था असणाऱ्यांमध्ये आता आवड निर्माण झाली होती. शालेय शिक्षणासोबत त्यांच्या विविध कौशल्यामध्ये वृद्धी होत होती.

## ७ - समारोप

हा उपक्रम मला पूर्णपणे समाधान मिळवून देऊ शकला नाही. कारण समाजामध्ये शिक्षणाची अनास्था मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसून येत आहे. त्यामानाने शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी केलेला माझा हा प्रयत्न निश्चितच प्रेरणा देईल. जुन्या व पारंपरिक विचारांनी जखडलेल्या आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचे परिवर्तन होणे आवश्यक आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून एक वेगळा आशावाद निर्माण झाला आहे. यातून शिक्षण प्रेमी नक्कीच प्रेरणा घेतील. "ज्ञान ज्योती लावू घरोघरी, दूर करू निरक्षरता

सारी" या बोधवाक्याप्रमाणे "आपलं फक्त एकच कर्तव्य शिक्षित करूया समाज सर्व" यानुसार शिक्षणाचा प्रचार व प्रसार करून त्याचे महत्त्व पटवून देऊन शिक्षणाची आवड निर्माण करणे. व्यक्तीच्या आयुष्यामध्ये शिक्षणाशिवाय परिवर्तन शक्य नाही याची जाणीव निर्माण करून शिक्षणगंगा घरोघरी पोहोचवण्याचा मूलमंत्र देत या उपक्रमाचा वसा समाजाला अर्पण करतो.



You, Sanjay Patil and...




2w Like Reply Hide 1

**Avinash Patil** Nitin Thakare...

**Tr Kanifnath Suryawanshi**
एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ
श्री. गोकुळजी पाटील, श्री. दिनेशजी बोरसे व आपला माजी विद्यार्थी मयुर पाटील यांच्या हातभाराने #बल्लीवरनी_शाळा राज्यभर पोहचण्यास नक्कीच मदत होईल, आपणा सर्वांचे मनपूर्वक अभिनंदन व पुढील उत्तमोत्तम शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा...!!!
💐🌹💐




## ८ - संदर्भसूची


शिक्षण संक्रमण

शालेय नवोपक्रम - म.रा. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

SCERT Maharashtra Research Bulletin Pune

राष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन व प्रशिक्षण परिषद प्रकाशित पुस्तके

जीवन शिक्षण

उपक्रमशीलतेतून कृती संशोधनाकडे - सिद्धाराम माशाळे

क्रमिक पाठ्यपुस्तके

# ९ - परिशिष्ट

परिशिष्ट "अ"

नवोपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|
| 1. | अर्चना आबा मोरे |
| 2. | दीपक शामराव बागले |
| 3. | अर्चना अधिकार सोनवणे |
| 4. | कृष्णा हिलाल मोरे |
| 5. | बादल हिलाल मोरे |
| 6. | शुभम संजय सोनवणे |
| 7. | गणेश जगदीश अहिरे |
| 8. | रोहिणी बादल मोरे |
| 9. | शुभम मनोज सोनवणे |
| 10. | गीता एकनाथ सोनवणे |
| 11. | शितल एकनाथ सोनवणे |
| 12. | शितल जगदीश अहिरे |
| 13. | भावना विजय पवार |
| 14. | विनाली अधिकार सोनवणे |
| 15. | दिनेश बापू बागुल |
| 16. | सविता शामराव सोनवणे |
| 17. | सोनाली हिलाल मोरे |

18. लक्ष्मी बापू बागुल

19. रवींद्र विजय पवार

20. मोंटी आबा मोरे

21. अश्विनी जगदीश अहिरे

22. संजीवनी जिभाऊ गायकवाड

23. गायत्री विजय पवार

24. गायत्री हिलाल मोरे

25. विशाल सुरेश सोनवणे

26. मीनाक्षी लाल मोरे

27. रोहित संजय सोनवणे

28. तेजस जिभाऊ गायकवाड

29. निलेश जिभाऊ गायकवाड

30. दिपाली संतोष सोनवणे

31. प्रवीण युवराज मोरे

परिशिष्ट "ब"

कार्यवाहीत करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे गट

इ० १ ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचा पहीला गट व इ० ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांचा दुसरा गट

परिशिष्ट "क"

नवोपक्रमाची फलनिष्पत्ती आजमावण्यासाठी तयार केलेला गुगल फॉर्म

https://forms.gle/53MX7J2Eh7EUUHUG9

परिशिष्ट "ड"

नवोपक्रमाचे निवडक फोटो







# १०  - सारांश

शिक्षणामुळे माणूस शीलवान, क्षमाशील व कर्तव्यदक्ष बनत असतो. मानवी जीवनाचा उद्धार करण्यासाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावत असते. म्हणून म्हणतात ना "शिक्षण देती जीवना आधार, त्याविन असे मानवी जीवन बेकार" या उपक्रमाच्या माध्यमातून काही प्रमाणात या लोकांच्या विद्यार्थ्यांच्या जीवनातील अंधार कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. शिक्षणाची जाणीव निर्माण करण्यात यश आले. शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून 'सुख समृद्धीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा' हा मंत्र जपण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाचा प्रचार व प्रसार करून समाज व राष्ट्र विकासासाठी प्रेरणादायी कामाकडे वळायचे आहे. पालक भेट व मार्गदर्शन व्यक्तिमत्व विकास, विविध सण उत्सव, विविध उपक्रम, पर्यावरण दिवाळी, स्वच्छता दूत, आनंददायी व कृतीयुक्त शिक्षण तसेच बोलक्या भिंती या माध्यमातून शिक्षणाची आवड निर्माण करण्याचा तसेच शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा व ठरवलेली उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला.

# ११ - ऋणनिर्देश

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे द्वारा आयोजित राज्यस्तरीय उपक्रम स्पर्धेत "बल्लीवरची शाळा" उपक्रम सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. ज्यांनी मला हा नवोपक्रम करण्याची प्रेरणा दिली ते आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. नानासाहेब महेंद्रजी विसपुते, सचिव मा. स्मिताताई विसपूते, विद्यालयाचे प्राचार्य श्री पी. बी. पाटील सर, मार्गदर्शक ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. जे. एस. पाटील, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या डॉ. मंजुषा क्षिरसागर, माझे सर्व सहकारी, पालक, माजी विद्यार्थी यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

हा नवोपक्रम करतांना शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व शिक्षक मित्र यांच्याकडून ही प्रेरणा मिळाली त्यांचे मार्गदर्शन मिळाले शरद पवार फेलोशिप च्या माध्यमातून काम करणारे व श्री श्याम रावले, श्री सचिन देसाई, नामदेव वाजे, भरत पाटील, तुकाराम पाटील, राहुल धुमाळ, डॉ ह. ना. जगताप, डॉ. माधव सुर्यवंशी, श्री योगेश कुदळे, डॉ किडगावकर या सगळ्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच या उपक्रमाला प्रसिद्धी देणारे सर्व वर्तमान पेपरचे संपादक महोदय एबीपी माझाचे प्रतिनिधी श्री धनंजय दीक्षित, महाराष्ट्र टाईम चे प्रतिनिधी श्री नागिंद मोरे, दैनिक सकाळचे श्री दीक्षित सर, दिव्य मराठीचे श्री अमोल पाटील व तालुक्याचे सर्व प्रतिनिधी बांधव यांचे मनापासून आभार व्यक्त करतो या नवोपक्रमात ज्या व्यक्तींची अप्रत्यक्षपणे मदत झाली त्यांचे सुद्धा मनापासून धन्यवाद.